# परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती

विद्यार्थी परिचारिका वसतिगृह इमारत, तळ मजला,सेंट जॉर्जेस रूग्णालय आवार, पी.डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

वेबसाईट: msbnpe.org ई-मेल- ppasss२०२२@gmail.com ,मो. नं: ०२२ २२६११०१५

## NURSING DIPLOMA COURSE SHIKSHAN SHULKA SAMITI

Student nurses hostel building, Ground floor, St. Georges hospital campus, p.d'melo road, Fort, Mumbai-४०० ००१

website: msbnpe.org e-mail- ppasss2022@gmail.com, mobile no- ०२२ २२६११०१५


क्र पपाअशिशुस/शिक्षण शुल्क समिती/मुदतवाढ/१३० /२०२५ दिनांक: ०७/०५/२०२५

### मुदतवाढ

विषय : शै.व. २०२४-२५ साठी महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळाशी संलग्नित असलेले खाजगी विना- अनुदानित महाविद्यालयातील ए.एन.एम. व जी.एन.एम.व इतर परिचर्या पदविका अभ्यासक्रमांचे शिक्षण शुल्क मंजूर करण्याकरिता प्रस्ताव सादर करणेबाबत.

संदर्भ : १. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.८९/२०/शिक्षण-१, दिनांक.१३.१२.२०२२

२. क्र पपाअशिशुस /शिक्षण शुल्क समिती/६३/२०२४, दिनांक: १६/०९/२०२४.

३. क्र पपाअशिशुस /शिक्षण शुल्क समिती/७५/२०२४, दिनांक: २९/११/२०२४.

४. क्र पपाअशिशुस /शिक्षण शुल्क समिती/७६/२०२५, दिनांक: १६/०१/२०२५.

५. क्र पपाअशिशुस /शिक्षण शुल्क समिती/९२/२०२५, दिनांक: २८/०२/२०२५.

६. क्र पपाअशिशुस /शिक्षण शुल्क समिती/१२२/२०२५, दिनांक: १७/०४/२०२५.

७. दिनांक: - ०५/०५/२०२५ च्या बैठकीनुसार.

उपरोक्त वरील संदर्भ क्र.१, २ व ३ अन्वये २०२४-२५ करिता ए.एन.एम.,जी.एन.एम.व इतर परिचर्या पदविका अभ्यासक्रमाचे शुल्क निर्धारित करण्यांकरिता प्रस्ताव शिक्षण शुल्क समितीकडे www.ndcsss.info या ऑनलाईन पोर्टलवर दि.१७/०९/२०२४ ते दि.३०/११/२०२४ या कालावधीसाठीमध्ये प्रसिध्द करण्यांत आलेले होते.

प्रथम मुदतवाढ दि. दि.०१/१२/२०२४ ते दि.३१/१२/२०२४ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यांत आलेली होती. द्वितीय मुदतवाढ दि.१५/०१/२०२५ ते दि.१५/०२/२०२५ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यांत आलेली होती. तिसरी मुदतवाढ दि.१६/०२/२०२५ ते दि.२८/०२/२०२५ या कालावधीसाठी प्रति कोर्स रु.१०,०००/- दंड आकारुन मुदतवाढ देण्यांत आली होती. चौथी मुदतवाढ दि.०१/०३/२०२५ ते दि.३१/०३/२०२५ या कालावधी साठी प्रति कोर्स रु.१०,०००/- दंड आकारुन मुदतवाढ देण्यांत आली होती. दि.०१/०४/२०२५ ते दि.१५/०४/२०२५ या कालावधी साठी प्रति कोर्स रु.२५,०००/- दंड आकारुन मुदतवाढ देण्यांत आली होती. त्यानंतर दि.१६/०४/२०२५ ते दि.३०/०४/२०२५ या कालावधी साठी प्रति कोर्स रु.५०,०००/- दंड आकारुन मुदतवाढ देण्यांत आली होती.

वारंवार मुदतवाढ देऊन सुध्दा काही संस्थांनी प्रस्ताव सादर केले नाही. तरी प्रस्ताव भरण्याकरिता **दि.०६/०५/२०२५ ते दि.२०/०५/२०२५** या कालावधी साठी **प्रति कोर्स रु.५०,०००/- दंड** आकारुन सदर मुदतवाढ देण्यात येत आहे. दि.२०/०५/२०२५ च्या रात्रौ १२.०० नंतर सदर पोर्टलवर कोणत्याही प्रकारचे ऑनलाईन प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत. तसेच संपुर्ण कालावधीत ज्या संस्थांनी प्रस्ताव सादर केलेले नाहीत, त्या संस्थांवर नियमानुसार कारवाई करण्यांत येईल, याची नोंद घ्यावी.

अध्यक्ष
शिक्षण शुल्क समिती,
तथा आयुक्त, वैद्यकीय शिक्षण विभाग